// प्रकरण : १ ले : //

प्रकरण : १ ले :

# // प्रास्ताविक //

१.१ : प्रास्ताविक

१.२ : विषय प्रवेश

१.३ : संशोधनाची गरज

१.४ : संशोधनाचे महत्त्व.

प्रकरण : १ ले :

१.१ // प्रास्ताविक //

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे महत्वाचे साधन आहे. समाजात प्रत्येक क्षेत्रात शिक्षणामुळे सतत बदल घडत असतो. प्रत्येक व्यक्ती जन्माला आल्यापासून कोणत्या ना कोणत्या प्रकारचे शिक्षण घेत असतो. परंतु प्रपचीन काळापासून आजपर्यन्तच्या शिक्षणाबाबत दिसून जर आपण विचार केला तर आपणांस असे दिसून येते की, प्राचीन काळातील शिक्षण पध्दती आणि शिक्षण, आजची शिक्षण पध्दती व दिले जाणारे शिक्षण यात अमूलाग्र बदल झालेला आहे. "प्राचीन काळी शिक्षण फार मोजक्या लोकांना मिळत होते. कारण प्रचीन काळी वर्णपध्दती होती. केवळ ब्राम्हण आणि क्षेत्रीय लोकांनाच शिक्षण दिले जात होते. परंतु त्यात देखिल सारखेपणा नव्हता. तसेच क्षुद्र आणि वैश्य हे आपापल्या परंपरेनुसार चालत आलेले जे व्यवसाय होते. त्यानुसार व्यवसाय करून उदरनिर्वाह करित होते".

२"त्याचप्रमाणे त्यावेळेस दिले जाणारे शिक्षणामध्ये देखिल पध्दती वेगळ्याच प्रकारची होती, कारण गुरूकुल पध्दती असल्याने शिष्याला गुरूच्या आश्रमात जावून त्या ठिकाणी अभ्यास करावा लागत होता आणि गुरूची सेवा करावी लागत होती. त्यासाठी त्यांना बराच वेळ खर्च करावा लागे. आणि शिवाय सर्व गोष्टींचा त्याग करावा लागत असे, आणि शिक्षण संपल्या वर गुरूदक्षिणा देवून स्वगृही परतत असत.

परंतु वरचेवर हळूहळू लोकसंख्या वाढत गेली आणि दिल्या जाणा-या शिक्षणात व शिक्षण पध्दतीत बदलत्या सामाजिक परिस्थितीनुसार आणि लोकांच्या वाढत्या गरजानुसार शिक्षणपध्दतीत व शिक्षणात बदल जाणवू लागला.

"ब्रिटीश काळानंतर इंग्रजी राजवटीचा परिणाम झाला आणि इंग्रजीचे प्रस्था वाढू लागले. त्यानंतर पुन्हा अनेक महायुध्द झाली साधारणपणे दुस-या महायुध्दानंतर औदयोगिक क्रान्ती झाली आणि धर्माला अनुसरून दिले जाणारे शिक्षण जाणून त्यात इंग्रजीचा आणि व्यावसायीक शिक्षणाचा परिणाम दिसून आला".

त्यानंतर सध्या आपण २१ व्या शतकाकडे वाटचाल करीत असतांना या आधुनिक आणि विज्ञान युगात पुर्वीची पध्दती आणि अभ्यासक्रम यात अमुलाग्र बदल झालेला दिसून येतो. "पुर्वीचा माध्यमिक शिक्षणातील ११-४ आकृतीबंध जावून १०-२-३ हा स्विकारला गेला. तसेच अभ्यासक्रमात सखोलता आणली गेली. शिवाय सध्या आपण पाहतो की महाराष्ट्र शासन देखिल व्यावसायिक शिक्षणावर अधिक भर देत आहे. म्हणजेच पुर्वीच्या आणि सध्याच्या शिक्षणात व पध्दतीत अमुलाग्र स्वरूपाचा बदल झालेला दिसून येतो"

"आपण नेहमी शिक्षण, शिक्षण असे म्हणतो मग शिक्षण म्हणजे तरी काय ? "शिक्षण म्हणजे ज्ञान" असा अनेक जाणते लोक अर्थ व ब-याच प्रमाणात तो खराही आहे".

कारण शिक्षणात ज्ञानाचा अंतर्भाव आवश्य होतो परंतु ज्ञान म्हणजे ~~साधारणपणे~~ शिक्षण ही कल्पना अपुरी आहे. ज्ञान म्हणजे साधारणपणे बुध्दीमत्ता, व्यासंग, विध्दता, असे मानले जाते. परंतु केवळ या गुणामुळेच त्यांना सुशिक्षित मानणे हेही मनाला पटत नाही.

मग शिक्षण म्हणजे तरी काय ? "शिक्षण शास्त्रज्ञांच्या मते "शिक्षण म्हणजेच विकास विदयार्थ्यांच्या ज्ञान, बुध्दी, विचार, कल्पना, संशोधन, जिज्ञासा, क्रियाशिलता, सृजन, शीलता, आवडीनिवडी, सद्प्रवृत्ती, नितीमत्ता, सामाजिक राष्ट्रयता, सौंदर्यदृष्टी, सहृदयाता, इत्यादी अनेक शक्ती, वृत्तींचा विकास घडवून आणणे व त्यातून सुविध सुसंस्कृत व

कार्यक्षम व्यक्तीमत्त्व निर्माण करणे हेच खरे शिक्षण".

शिक्षण घेणे म्हणजेच शिकणे शिकण्याची क्रिया जरी नैसर्गिकपणे होत असली तरी, "प्रत्येक व्यक्तीला मार्गदर्शन करून योग्य ते वळण लावण्यासाठी अध्यापनाची आवश्यकता आहे. अध्यापन क्रियेला चालना देणे तिच्यात सहजा व गतिमानता आणणे आवश्यक त्या मार्गदर्शनाखाली तिचे पध्दतीशिर संयोजन करून विद्यार्थ्यांच्यात अपेक्षित व इष्ट दिशेने विकास घडवून आणणे हेच अध्यापनाचे कार्य". सध्या आपण पाहतो शाळा महाविद्यालयातून विविध विषयांचे अध्यापन केले जाते.

शाळा, महाविद्यालयातून शिकविल्या जाणा-या विषयांत भूगोलाचा देखिल समावेश आहे. "दिवसेंन दिवस भूगोल हे मानवा - संबंधीत घटकांना एक वेगळे वळण लावण्याचा दृष्टीकोनातून वाढत आहे. भूगोलाचा अभ्यासक्रम जाणून घेण्यासाठी भरीव पार्श्वभूमी करण्याचे कार्य विविध नविन अशा साधनांद्वारे केले जात आहे. भूगोल विषयांकरिता दैंन दैनंदिन जिवनातील अनुभव आणि अवती भोवतीची परिस्थिती यामधून घटक निवडले जावेत अशी अपेक्षा आहे."

तरीदेखिल आपण पाहतो की प्राचीन काळापासून भूगोलाकडे विशेष महत्त्व दिले जात नाही आणि त्यामुळेच भूगोलाचा अभ्यास हा व्यवस्थीत पध्दतीशिरपणे होणे यासाठी अभ्यासकाने हा विषय घेतला आहे. कारण आपण पाहतो की नेहमीच असे वक्तव्य केले जाते की, "भूगोलाच्या रंगमंचावर इतिहास घडवला जातो आणि याचा दाखला प्राचीन काळापासून दिसून आलेला आहे". तेंव्हा आज आपण पाहतो की, भूगोलाचा अभ्यास हा योग्य त्या पध्दतीने उद्दिष्टांना अनुसरून आणि पध्दतशीरपणे व्हावे यासाठी भूगोलाच्या अध्यापनाचा अभ्यास व्यवस्थित व्हावा ही अपेक्षा आहे.

=-=-=-=-=-=

१.२ // विषय प्रवेश //

भूगोल विषयाचा विस्तार गेली तीनशे वर्षापासून खूप वाढला असून दुस-या जागतिक महायुध्दानंतर स्वतंत्र्य झालेल्या प्रत्येक लहान मोठया राष्ट्रातील लोकांना भूगोल विषयाचा नविन दृष्टीकोनातून अभ्यास करावा लागतो. "स्वतंत्र्य भारतातील लोकशाही राजवटीमध्ये आमलात आणलेल्या तीन पंचवार्षीक योजनांच्या आखणी - अम्मलबजावणीमध्ये अनेक प्रकाराचा बदल झाला". भूगोल ज्ञानाच्या वाढत्या व्यापाची शाळेतील विदयार्थी त्याचे पालक, त्याचे शिक्षक, त्याचे प्रतिनिधी व पुढारी यांनी अदयाप फारशी दखल घेतली नाही. "भूगोल विषयांच्या ज्ञानाची कक्षा मानवी जीवनाशी फार जवळून संबंधित असल्यामुळे मनुष्याच्या व्यवहाराच्या कक्षा किंवा मर्यादा जसजशा वाढत जातात तसतशी भूगोलची व्याप्ती वरचेवर वाढती राहत आहे."

"निसर्ग व मानव कधी जोडीने, सहकार्याने तर कधी एकमेकावर कुरघोडी करून मानवी जिवनाची प्रगती करीत होते." मानवी प्रयत्नामुळे भूगोल विषयाच्या अभ्यासाचे क्षेत्र वाढू लागले व त्यामुळे सर्वसामान्य नागरिकास भूगोलातील गोष्टीचा अभ्यास करणे आज आवश्यक ठरते.

"सन १९७१ मध्ये श्री. डिसोजा यांनी भूगोल विषयातील चुकांचे निर्मूलन करण्यासाठी कांही उपाय सांगितले. त्यात त्यांनी प्रात्यक्षिक कामावर भर दिला आहे".

१. भूगोलचे अध्यापन प्रायोगिक दृष्टीकोनातून पाहिल्यास ते अधिक पध्दतशीर आणि सुटसुटीत दिसून आलेले आहे.

२. प्राचीन काळी भूगोलला विशेष महत्त्वाचे स्थान नव्हते परंतु वरचेवर बदलती परिस्थिती व मानव आणि पर्यावरण यांचा संबंध अधिक

प्रमाणात वाढतअसल्यामुळे भूगोलचे अध्यापन अधिक प्रभावीपणे व्हावी अशी भूगोल शिक्षकांकडून अपेक्षा बाळगली जात आहे व त्यासाठी वरचेवर प्रयत्न केले जात आहेत.

३. "शिकागो विद्यापिठातील डॉ. बेजांमिन ब्लूम यांनी १९५७ च्या मार्च महिन्यात बडोदा येथे माध्यमिक शिक्षक प्रशिक्षण संस्थातील १०० प्राध्यापकांच्या कृतीसभात विविध विषयांच्या अध्यापनाची उद्दीष्टे व त्यानुसार विदयार्थ्यात होणारे बदल निश्चित केले.

त्याच अधारावर "१९६५ साली जून महिन्यात पुणे येथे टिळक कॉलेज ऑफ एज्युकेशन मध्ये भरलेल्या एकोणीसप्रशिक्षण महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या कृती सभात भूगोल अध्यापनाची उद्दिदष्टे व विद्यार्थी कृतीतील बदल निश्चित केला आणि त्या योगे शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जावू लागला आहे.

=-=-=-=-=-=-=

## १.३ // संशोधनाची - गरज //

बदलत्या काळानुसार आणि सामाजिक परिस्थिती नुसार सध्याच्या विज्ञान आणि आधुनिक युगात मानव पर्यावरणाचा करून घेत असलेला उपयोग आणि बदलीती भौगोलिक परिस्थिती यांचा विचार करता आपल्या उदयाच्या नागरीकांनी कांही सामाजिक कौशल्य संपादन करावी अशी क्षमता विदयार्थ्यात निर्माण करणे ही गरज आज निर्माण झाली आहे.

प्राचीन काळी भूगोलला विशेष महत्वाचे स्थान नव्हते. परंतु "२९, डिसेंबर १९६४ च्या शासनाच्या अभ्यास क्रमानुसार ६ व्या कलमातील संकल्पनेत भूगोलाचा अभ्यासक्रमात समावेश केला गेला.

त्यानंतर "११ मे १९६६ ला महाराष्ट्र शासनाने अंतिम मसुदा तयार केला व २९ जून १९६६ ला शिक्षण महामंडळाने पुढील बाबी सांगितल्या त्यात त्यांनी स्तर केले.

१. कनिष्ठस्तर [प्रास्ताविक स्तर] : इयत्ता १ ते ४ त्यासाठी त्यांनी तिसरा विषय सभोवतालच्या वातावरणाचा अभ्यास म्हणून ठेवला व दुसरा स्तर.

२. वरिष्ठ स्तर [प्राथमिक स्तर] : इयत्ता ५ ते ७ यासाठी ४ था विषय समाजशास्त्र म्हणून ठेवला व त्यातून भूगोलाचा अभ्यास विदयार्थ्यांना कोणत्या प्रकारे शिकविला जावा हे विविध विचारधारांद्वारा स्पष्ट केले. नंतर पुन्हा कालांतराने ३ ते ४ इयत्तांना भूगोल विषय स्वतंत्र्य ठेवला गेला. त्याचवेळेस इयत्ता ३ पासून प्रत्येक वर्गाला साधारणपणे कोणता अभ्यासक्रम असावा हे ही नेमणून दिले गेले.

कारण भावीनागरिकांना "विशाल जगाच्या रंगमंचाची अचुक कल्पना आणून देणेआणि त्यायोगे त्यास भोवतालच्या जगातील राजकीय सामाजिक प्रश्नांचा जिव्हाळ्याने अभ्यास करण्यासाठी भूगोलाच्या अध्यापनाची गरज निर्माण झाली." कारण इतर कोणत्याही विषयापेक्षा भूगोल मानवाचे सारे जिवन व्यापून टाकते. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यन्त मानवाच्या प्रत्येक क्रियेशी भौगोलिक वस्तु किंवा घटकांचा संबंध येत असतो.

अभे शाळा - कॉलेजमधील विदयार्थी प्रौढ, स्त्री, पुरुष यांना या ना त्या कारणासाठी भौगोलिक माहिती आवश्यक आहे तसेच भारता सारख्या शेतीप्रधान देशातील नागरिकांना शिवाय विविध व्यापारी कंपन्याना आवश्यक माहिती जाणून घेण्यासाठी त्याचप्रमाणे देशादेशातील चांगल्या संबंधाची आवश्यकता पटण्यासाठी

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

व आंतरराष्ट्रीय सामजंस्य वाढीस लागण्यासाठी भूगोल अध्यापनाची आवश्यकता आहे असे वाटते." २०

"विद्यार्थ्यांची मानसिक अवस्था, त्याचे वय व त्यासाठी नेमलेला अभ्यासक्रम यांचा विचार करता विद्यार्थ्यांची बौध्दीक कुवत त्याच्या विकासाच्या अवस्था आणि विद्यार्थ्यांची चिकित्सक वृत्ती किंवा अमूक एखादी गोष्ट अशीच का? यासंबंधी जाणून घेण्याची जिज्ञासा वाढत चाचलली आहे" २१ त्यामुळे शाळेत भूगोल शिकवत असताना तो कोणत्या पध्दतीने शिकविला जातो. उद्दीष्टांना अनुसरून शिकविला जातो किंवा नाही त्याचप्रमाणे शिक्षकाचे अध्यापक कसे आहे समाधानकारक आहे किंवा नाही हे ही पाहणे महत्त्वाचे आहे.

भूगोल विषयाचे अध्यापन अधिक प्रभावी होण्यासाठी भूगोल विषय शिकांनी व्याख्याप पध्दती सोडून देऊन नवीन अध्यापन संत्राचा अवलंब केला पाहिजे. त्यासाठी शैक्षणिक साधनांचा आलेख नकाशे, भौगोलिक माहिती व चित्र संग्रह यांचा योग्य वेळी वापर करून भूगोल विषयाबाबत विद्यार्थ्यांच्या मनात आवड निर्माण करणे गरजेचे आहे. कारण

"माध्यमिक शाळेतील शिक्षकांना भूगोलाच्या अध्यापनासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. त्याचप्रमाणे त्यांना दोन किंवा त्यापेक्षा अधिक विषय शिकवावे लागतात म्हणून केवळ नेमून दिलेला अभ्यासक्रम संपविणे हेच एक उद्दिदष्ट डोळ्यासमोर असते. आणि तो संपविण्यासाठी केवळ उपलब्ध असणा-या तासिकांमध्ये कोणत्याही सांधनाचा वापरन करता केवळ व्याख्यानपध्दतीचा आधार घेतला जातो"

त्याचप्रमाणे पाठ्यपुस्ताकातील कांही घटक पर्यावरणाचा आधार घेऊन शिकविता येतात परंतु वेळेअभावी त्याचप्रमाणे शिक्षकांची प्रवृत्ती आणि त्याचे ज्ञान याचा विचार करता तसे करणे शक्य होत नाही.

उदा:-

[१] "प्रदूषण ही एक ज्वलंत समस्या आहे कारण १८ व्याशतकानंतर व दुस-या महायुध्दामुळे औदयागिकी करणात झपाटयाने वाढ झाली भरमसाट उत्पादन वाढू लागले लोकांना रोजगार मिळू लागले. लोकांची आर्थिक स्थिती उंचावली परंतु त्याचवेळेस कारखान्यातून ओकणा-या धुरामुळे आणि दूषित पाण्यामुळे प्रदुषनाची समस्या जाणवू लागली त्यामुळे मानवाचे आरोग्य धोक्यात येऊ लागले. हवा, पाणी, अन्न, दूषित होऊ लागले"

[२] "स्थानिक पर्यावरणातील काही घटक उदा:- शेती नदीकार्य, विविध भूरूपे, जमिन, खडक प्रकार तसेच भूगोलातील काही संज्ञा संबोध, संकल्पना या विविध शैक्षणिक साधनांच्या आधारे शिकविता येतात." परंतु त्यापध्दतीने शिकविल्या जातत किंवा नाही हे ही पाहण्याची गरज आज निर्माण झाली आहे. म्हणूनच अभ्यासकांनी हा विषय अभ्यासासाठी हा विषय निवडला आहे.

तसेच अभ्यासकांनी स्वत: भूगोल या विषयातील एम.ए. ची पदवी संपादन केलेली आहे त्याचप्रमाणे ते स्वत: एम.एड आहेत. त्यांना २ वर्षे माध्यमिक शिक्षण म्हणून २ वर्षे कनिष्ठ महाविदया-लयात अधिण्याख्याता म्हणून काम केले आहे. परंतु या काळात त्यांना भिरीक्षणाद्वारे आणि अनुभवाद्वारे असे आढळून आले की, माध्यमिक शाळेतील रित्या शिकवला जात नाही आणि विदया-र्थ्यांची भूगोलातील प्रगती देखील असमाधानकारकच दिसून आल्याने या विषयावर संशोधन व्हावे असे वाटले म्हणून अभ्यासकांनी हा विषय अभ्यासासाठी निवडला आहे.

## १.४ // संशोधनाचे महत्त्व //

" भूगोलास मानवी जीवनात नगण्य असे स्थान आहे. कारण आपले जीवन यशस्वी व्हावयाचे असेल तर भौगोलीक घटनांचा आपण सखोल अभ्यास केला पाहिजे" आपल्या जीवनातील पाणी, अन्न, वस्त्र, निवारा, व्यवसाय व गरजेच्या शेकडो वस्तू या सा-या गोष्टींचा संबंध भूगोलाशी आहे. त्याचप्रमाणे राष्ट्राराष्ट्रातील परस्पर सामजस्थ तसेच परस्परावलंबन याचाही अभ्यास आपणाला भूगोलाच्या अध्यापनाद्वारे आनभावता येतो हे सिध्द झाले आहे.

"उद्याचे भावी नागरिक असणा-या विद्यार्थ्यांचे ज्ञान, कौशल्य, अभिरूची यात बद्दल घडविण्याचे कार्य देखील करता येते. शिवाय डार्विनच्या सिध्दातानुसार जर जगातील जिवाच्या उत्क्रांतीकडे किंवा बदलाकडे पाहिले तर निसर्गाचा म्हणजेच नैसर्गीक जीवनावरही परिणाम झाल्याचे भूगोलाच्या अभ्यासाने आजभावता येते. "वेळोवेळी उदभवणा-या नैसर्गिक आपत्तीवर मात करून मानवी जीवन अधिक सुखकारक करण्यासाठी तसेच दैनंदीन व्यवहारातील गोष्टी प्रत्यक्ष - अप्रत्यक्षपणे अभ्यासण्यासाठी मानवाला भूगोलाच्या अभ्यासाचे ज्ञान आवश्यक आहे. त्याचप्रमाणे भौगोलिक, शैक्षणीक साधने उदा. नकाशे प्रतिकृती, मॉडेल, फिल्मस्ट्रीप चित्रे, तक्ते, नमुने इत्यादीच्या साहयाने मानवास भौगोलीक घटकाचे ज्ञान अधिकाधिक लवकर समजते. त्याचप्रमाणे उपलब्ध भौगोलीक परिस्तीथीत कल्पनाशक्तीच्या साहयाने आपले राहणीमान आणि आर्थीक विकास हा ही मानवास योग्य रितीने करता येतो.

"निसर्ग मानवास चारी हातानी सुख व वैभव देत असतो. परंतु त्याचा जर कोप झाला तर मानवाचा नाश देखील होवू शकतो याचेही ज्ञान भूगोलच्या अभ्यासाने होते."

" भूगोलाच्या रंगमंचावर इतिहास घडवला जातो म्हणतात हे म्हणणे देखील सत्य आहे कारण प्राचीन काळी शिवाजीला देखील हिंदूचे -

सामाज स्थापन करण्यास आणि ते वाढविण्यास उपलब्ध असणारी भौगोलिक परिस्थितीचि उपयोगी पडली आणि त्यामुळे त्यांना हिंदूचे वर्चस्व प्रस्थापीत करता आले". म्हणूनच एकंदरीत प्राचीन काळापासून भूगोलाचे मानवी जिवनात फार मोठे महत्व असल्याचे आपणांस दिसत आहे. परंतु माध्यमिक शाळांमधून भूगोलाच्या अध्यापनाला म्हणावे तसे महत्व देवून योग्य त्या पध्दतीनुसार, उद्दिष्टांना अनुसरून शैक्षणिक साधनांचा अवलंब करून, पर्यावरणाचा आधार घेवून, क्षेत्रिय व प्रात्यक्षिक कार्यावर भर देवून आणि काळजी-पुर्वक हा विषय शिकविला जात नाही असे दिसून आल्यामुळेच हा विषय अभ्यासकांनी संशोधनासाठी निवडलेला आहे.

=-=-=-=-=-=-=-=-=-=

## // संदर्भ //


| | | |
|---|---|---|
| १ व २] | गद्रे | शिक्षणाच्या इतिहास भाग - १<br>व्हीनस प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती १९७१, पृष्ट क्र. ७२. |
| ३] | म. बा. कुंडले | अध्यापनाची व मुल्यमापनाची मुलतत्त्वे :<br>व्हीनस प्रकाशन, पुणे<br>पहिली आवृत्ती, फेब्रु १९७०.<br>पान नं. १. |
| ४] | भा. गो. बापट | भूगोलाचे अध्यापन<br>सुधारित आवृत्ती, मार्च १९८१,<br>व्हीनस प्रकाशन पुणे. पान १५ |
| ५ व ६] | म. बा. कुंडले | अध्यापनाची व मुल्यमापनाची मुलतत्त्वे -<br>व्हीनस प्रकाशन, पुणे<br>पहिली आवृत्ती, फेब्रु १९७०<br>पान नं. २. |
| ७] | य. श्री. मेहेंदळे | समाजशास्त्राची मुलतत्त्वे :<br>तृतीयावृत्ती १९७१, मेहेंदळे प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९७१, पान २७. |

| | | |
|---|---|---|
| ८ व ९] | शैलजा सांगळे | स्पेशल दृष्टीक्षेपात भूगोल - व्हीनस प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, १९७१, पान २७ |
| १०] | लीला पाटील | आजचे शिक्षण आजच्या समस्या - प्रथमावृत्ती, १९७१, श्री. विद्या प्रकाशन पुणे, पान नं. ८५ |
| ११] | ना. वि. पाटणकर | भूगोलाचे अध्यापन - प्रथमावृत्ती १०७०, व्हीनस प्रकाशन, पुणे, पान. नं. २७. |
| १२] | म. वा. कुंडले | शैक्षणिक तत्वज्ञान शै. समाजशास्त्र - महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळासाठी, श्री. विद्या प्रकाशन, २५०, शनिवार अष्टभुजारस्ता, पुणे - ३० दुसरी आवृत्ती. पृष्ट क्र. १४२. |
| १३] | भूगोल शिक्षक | त्रैमासिक - जुलै ते सप्टें. सन. १९८८ पा. नं. १४ |
| १४, १५ व १६] | ग. वि. अकोलकर | भूगोलाचे अध्यापन - विद्या प्रकाशन पुणे प्रथमावृत्ती १९७१, पृष्ट ९७. |
| १७ व १८] | द. बा. पोंक्षे | भूगोलाचे अध्यापन - प्रथम आवृत्ती १९७०, नुतन प्रकाशन, पुणे, प्रकाशन क्र. ३४, पृष्ठ क्र. २५. |

१९ व २०] शैलजा सांगळे — स्पेशल दृष्टीक्षेपात भूगोल : व्हीनस प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती, १९७१, पान नं. ३७.

२१] आ.पां. खरात — प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र, प्रथमावृत्ती, १९७०, विद्या प्रकाशन, पुणे पान १२४.

२२, २३, २४ व २५] भूगोल शिक्षक — त्रैमासिक - आक्टोंबर ते डिसेंबर, डिसे. स.नं. १९८८, पान नं. ३२.

२६] भा.गो. बापट — भूगोलाचे अध्यापन : प्रथम आवृत्ती १९७०, विद्या प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. १९.

२७, २८] द.बा. पोक्षे — भूगोलाचे अध्यापन - सुधारित आवृत्ती १९७१, नुतन प्रकाशन, पुणे पृष्ठ क्र. १०९.